सत्यं शिवं सुंदरम् दिनांक:- १२-४-०६

श्री. हावगीस्वामी महाविद्यालय उदगीर

एम.ए. द्वितीय वर्ष(मराठी)

शैक्षणिक वर्ष 2005-2006

## 'अभिप्राय'

प्रति,

प्रा.म.ई.तंगावार

मराठी विभाग

आदर्श गुरू आपल्या आचार-विचारांतून आपल्या शिष्यावर नकळत संस्कार घडवत असते. गुरूचे शिस्तबद्ध वागणे, गुरूची ज्ञानलालसा, गुरूची अनासक्त वृत्ती सर्व शिष्यांना गुरूकडून मिळणारी समान वागणूक, त्या आणि अशा अनेक गोष्टी शिष्याच्या जीवनाला नकळत आकार देत असतात. अशाच प्रकारे तुम्ही एक आदर्श गुरु आहात असे मला वाटते कारण तुमच्याकडून आदर्श घ्यावे असे तुमचे वर्तन असते. सर तुम्ही सर्व विद्यार्थ्यांना मदत करता. सर तुमच्याकडे 'मी' पणा नाही. सर मला निरोप-समारंभाच्या दिवशी खूप बोलायचं होत ते पण 'सर' 'ओर' नाही. पण त्या दिवशी सगळे खोट बोलत होते. एक दोन विद्यार्थी सोडले तर सर माझं तुमच्याबद्दल खूप चांगलं मत आहे. आणि माझा स्वभाव खर बोलणार असून मी त्या दिवशी मी त्या दिवशी मला जे वाटलं तेच बोलले असते. माझ्याकडून जे काही चांगलं बोललं गेलं असतं ते फक्त तुमच्यासाठी. पण इतरांना ते पटलं नसत. म्हणून मी बोलले नाही. सर माझं प्रकल्प लेखन फक्त तुमच्यामुळे पुर्ण होऊ शकले. कारण तुम्ही मला चांगलं मार्गदर्शन केलात वेळोवेळी पुस्तक उपलब्ध करून दिलात. साहित्यसंमेलनातून तुम्ही माझ्यासाठी पुस्तक आणलात मला खुप आनंद झाला. सर तुम्ही मलाच नाही तर प्रत्येक विद्यार्थ्यांना मदत करता त्यामुळे सर्वजनच तुमच नावं घेतात. सर तुम्ही सर्वांनाच प्रोत्साहन देतात.

'तुम्हाला जमत तुम्ही हे करा यामध्ये काहीच अवघड नाही' असं म्हणून तुम्ही आमच्यात आत्मविश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न केलात त्याबद्दल धन्यवाद. सर मी हे सर्व अगदी मनातून लिहते. तुम्ही लिहायला सांगितलात म्हणून लिहित नाही तर मला या दोन वर्षात जे वाटलं तेच मी लिहित आहे. सर तुम्हाला विद्यार्थी घडवायचे आहेत बिघडवायचे नाहीत. त्यासाठीच तुम्ही विद्यार्थांशी चांगलं बोलता, निस्वार्थपणे विद्यार्थ्यांची सेवा करता. तुमच्याकडे

विद्यार्थींबद्दल कसलाच भेदभाव नाही. सर्व विद्यार्थी तुमच्यासाठी समान आहेत. सर तुम्ही आम्हाला म्हणालात की, माझ्यातले दोष सांगा, दोषच नाहीतच तर काय सांगायचं. सर तुमच्यामध्ये दोष दिसले नाहित, दिसत नाहित आणि दिसणारही नाहीत. असे मी ठामपणे म्हणू शकते.

सर तुमच्याबद्दल एका वाक्यात सांगायचे म्हणजे 'विद्यार्थीप्रिय शिक्षक' असेच म्हणेन. सर खंत फक्त एका गोष्टीची आहे की तुम्ही आम्हाला ह्यावर्षी (M.A.S.Y.) शिकवायला नव्हतात. सर ~~[illegible]~~ तुम्ही आम्हाला शिकवण्यासाठी नव्हतात तरी वेळोवेळी आम्हाला मार्गदर्शन केलात त्याबद्दल धन्यवाद.

सर मी विद्यार्थी या हक्काच्या नात्याने तुमच्याकडून अशी अपेक्षा करते की तुम्ही तुमचा स्वभाव बदलू नका. येथून पुढे येणाऱ्या सर्व विद्यार्थीना असेच आमच्यासारखीच वागणूक द्या. कारण सर विद्यार्थी हा प्रेमाने, आपुलकीने, जिव्हाळ्याने सुधारतो. रागाने आणखीन बिघडतो. असे मला वाटते.

सर तुमच्यासारखे गुरु मला लाभले हे मी माझे भाग्यच समजते.

"शुद्ध आचार विचारांचे
सुर्याप्रमाणे सत्याचा प्रकाश पाडणारे.
चंद्राप्रमाणे शीतलता आणि शांती
सर्वांना देणारे असे सत्यप्रिय माणूस
आहात."

सर तुमच्या सर्व इच्छा आकांक्षा पूर्ण होवोत ही ईश्वरचरणी प्रार्थना करते. गुरुबद्दल मी माझे मत पहिल्यांदा व्यक्त करत आहे. गुरुचे गुण दोष काढण्याइतपत मी मोठी नाही. तरी मी लिहिण्याचा प्रयत्न केला. काही चुकले असेल तर क्षमा करावी.

आपली विद्यार्थीनी
कु. घोडके सुवर्णा अनुरथ
एम. ए. द्वितीय वर्ष (मराठी)
२००५-२००६.

पत्ता
घोडके सुवर्णा अनुरथ
विद्या नगर, जळकोट रोड,
उदगीर. जि. लातूर.
दुरध्वनी क्र. :- २५८४००